प्रशासकीय विभागातंर्गत खरेदीसाठी
<u>समिती गठीत करणे.</u>

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक - यंत्रसा- १०१५/प्र.क्र.४/तीन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - १८ जानेवारी, २०१६.

वाचा- १) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.१७१/अर्थ-३ दिनांक १६ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना -

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची नियमपुस्तिका प्रसिध्द केली आहे. उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार, प्रशासकीय विभागांनी त्यांच्या कार्यालयांसाठी खरेदी करण्यात यावी, अशा सूचना वित्त विभागाने संदर्भीय अनुक्रमांक २ येथील परिपत्रकान्वये दिल्या आहेत. नियम पुस्तिकेच्या परिच्छेद क्रमांक २.९.२ मध्ये नमूद केल्यानुसार सर्व प्रशासकीय विभागांना खरेदी प्रक्रिया पार पाडता यावी, यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभाग/कार्यालयांतर्गत **खरेदी समिती** गठीत करावयाची आहे. त्यानुसार संसदीय कार्य विभागाअंतर्गत खरेदी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये प्रसिद्ध केलेल्या नियमपुस्तिकेत विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया हाती घेण्यासाठी संसदीय कार्य विभागासाठी खालीलप्रमाणे खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे :-

१. सचिव (संसदीय कार्य विभाग)	:	अध्यक्ष
२. सह सचिव/उप सचिव	:	सदस्य
३. अवर सचिव	:	सदस्य सचिव
४. लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट-ब दर्जाचा लेखाधिकारी	:	निमंत्रित
५. उद्योग सह संचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी	:	निमंत्रित
६. अन्य विभागाकडून कोणतही निमंत्रित, आवश्यकता असल्यास	:	निमंत्रित
७. तांत्रिक तज्ञ, आवश्यकता असल्यास	:	निमंत्रित

२. नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.१० मधील तरतूदीनुसार संसदीय कार्य विभागाच्या वतीने पूरवठादाराबरोबर करार करण्यासाठी अवर सचिव (गट-अ), संसदीय कार्य यांना नामनिर्देशित करण्यात येत आहे.

३. नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.९.२ मधील तरतूदीनुसार विहित केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करुन खरेदी करावयाच्या बाबीसंबंधात सर्व निर्णय उक्त समितीला घेता येईल. जर खरेदीचे अंदाजित मूल्य रूपये १०,००,०००/- पेक्षा कमी (रूपये दहा लाखापेक्षा कमी) असेल तर, विभाग प्रमुखाला खरेदी संबंधी उक्त खरेदी समितीची बैठक न बोलाविता निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०११८१५२०१०३११५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suhas Anantrao Deshpande

Digitally signed by Suhas Anantrao Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=602b3053d2d5715af6e36bc14492171797f6535d24cfb21b4c91e4cd563032bf, serialNumber=ab1c94477a634b6c4766f36e49fb2e268a6755445ea2fac5d7b3a8d9684f3ec3, cn=Suhas Anantrao Deshpande
Date: 2016.01.18 15:21:08 +05'30'

(सु. अ. देशपांडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) महालेखापाल महाराष्ट्र - १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) संचालक, लेखा व कोषागारे, प्रशासकीय इमारत, मुंबई.
५) संचालक, उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) मा. सचिव (संसदीय कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
८) संसदीय कार्य विभागातील कार्यासन अधिकारी दोन, चार, पाच व सहा.
९) उप सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग-४), मंत्रालय, मुंबई-३२.
१०) उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३), मंत्रालय, मुंबई-३२.
११) निवड नस्ती.